जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १०५ दिनांक - ११/०२/२०२४**

लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे शहर

# खुन,दरोडा,जबरी चोरी,घरफोडी इत्यादी गुन्हयातील व मोक्का गुन्हयामधील फरार आरोपीस लोणीकंद पोलीसांनी केले जेरबंद

खुन,दरोडा,जबरी चोरी घरफोडी इत्यादी सारख्या गंभीर गुन्हयामध्ये सहभागी असलेला आरोपी नामे गणेश रामभाऊ चव्हाण वय २१ वर्षे हा शिरगाव परंदवाडी पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड आयुक्तलयातील पोलीस स्टेशन मध्ये दाखल झालेल्या एका खुनाच्या गुन्हयातील पाहीजे असल्या बाबतची माहीती लोणीकंद पोलीस ठाणे येथे मिळाली होती.शिरगाव परंदवाडी मध्ये सदर आरोपीने त्याची भावजय नामे सुनंदा चव्हाण हीचा स्वःतचा भाऊ व तिचा पती लक्ष्मण चव्हाण याचे मदतीने तिचे डोक्यात दगड घालुन खुन केला व थंड डोक्याने ते प्रेत जवळ असणाऱ्या पाचार्णे गावच्या डोंगरात नेवुन तिथे टिकावाचे सहाय्याने खड्डा खोदुन पुरुन टाकले त्यानंतर परत येवुन दारु व मटनाचे जेवण बनवुन पार्टी केली. अशा पध्दतीने प्रेताची विल्हेवाट लावली आहे.अशी बातमी मिळाल्याने सदरचा आरोपी हा लोणीकंद पोलीस स्टेशनचे हद्दी मध्ये अधुन मधुन येत असल्याने या पोलीस ठाणेचे तपास पथकाचे अंमलदार अजित फरांदे यांनी त्यांचे बातमीदारांना याबाबत जागृत राहण्याचे सुचित केले होते.

आज रोजी सदरचा आरोपी हा लोणीकंद पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात त्याचे सासरे यांचेकडे येणार आहे अशी माहीती पोलीस नाईक अजित फरांदे यांना बातमीदारांकडुन प्राप्त झाली होती ती तात्काळ मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे यांना दिली त्यावरुन सहा.पो.निरी.रविंद्र गोडसे यांचे नेतृत्वाखाली एक पथक नेमण्यात आले.पथकाचे पोलीस अंमलदार किरण पड्याळ,अजित फरांदे, महिला पोलीस अंमलदार प्रतीक्षा पानसरे यांनी प्राप्त झालेल्या बातमीनुसार जिल्हा परीषद शाळा लोणीकंद च्या जवळ सापळा लावला. सदरचा आरोपी हा त्याठिकाणी येताच नमुद स्टाफने त्यास लागलीच झडप घालुन जेरबंद केले व त्यास लोणीकंद पोलीस स्टेशन येथे आणले सदर आरोपीला खुनाच्या गुन्हयातील पुढील तपास कामी शिरगाव परंदवाडी पोलीस स्टेशन कडील तपासी अधिकारी पोउपनि सचिन सुर्यवंशी व त्यांचे पथक यांचेकडे सुपुर्त करणेत आले आहे.

त्याचे वर खालील प्रमाणे गुन्हे दाखल असुन त्याचे विरुध्द चाकण पोलीस ठाणे कडील गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियमाप्रमाणे कलम वाढ करणेत आली असुन दाखल गुन्हयात तो पाहीजे आरोपी होता.

१)शिरगाव परंदवाडी पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड गुन्हा रजि.क्रं. १२/२०२४ भादवि ३०२,२०१
२)चाकण पोलीस ठाणे पुणे येथे गुन्हा रजि.नं.३४२/२०२२ भादवि ३७९
३)लोणीकंद पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्रं.७७६/२०१९ भादवि ४६१,३८०
४)बेलवंडी पोलीस ठाणे अहमदनगर येथे गुन्हा रजि.क्रं.१७७/२०१८ भादवि ३९५
५)अहमदनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्रं. ३८२/२०१९ भादवि ३९४,३४

सदरची कामगिरी मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर श्री.संजय पाटील, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,लोणीकंद पोलीस ठाणे,पुणे शहर,श्री.विश्वजीत काइंगडे यांचे मार्गदर्शना खाली तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक,रविंद्र गोडसे, पोलीस अमंलदार किरण पड्याळ,अजित फरांदे,महिला पोलीस अमंलदार प्रतीक्षा पानसरे यांनी केली आहे.